0 2 OCT 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलानुसार पूरनियमन करावे

## प्रदीप पुरंदरे : विद्यापीठात व्याख्यान, धरण भरण्याच्या तारखा बदला

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** हवामान बदलानुसार जलव्यवस्थापन व पूरनियमनात बदल करावे लागतील. मान्सूनचा कालावधी बदलतो आहे, त्याप्रमाणे सिंचन हंगाम व धरण भरण्याच्या तारखा बदलाव्या लागतील. ज्या धरणांना पुराचा अधिक धोका आहे, अशा निवडक धरणांच्या जलाशयातील काही टक्के साठवण क्षमता पुरासाठी आरक्षित ठेवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. प्रदीप पुरंदरे यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडीज'मार्फत 'हवामान बदल व शाश्वत विकास' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेत त्यांनी चौथे पुष्प गुंफले. त्यांचा विषय 'हवामान बदल आणि महापुराचे नियोजन' असा होता. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. नैसर्गिकरीत्या होणाऱ्या हवामान बदलाची तीव्रता व गती ही मानवी हस्तक्षेपामुळे अधिक वाढली आहे. जून २०२१ मधील तापमान गेल्या १४२ वर्षांतील सर्वाधिक तापमान म्हणून नोंदविले गेले. याच महिन्यात सर्वांत जास्त आपत्तीजनक 'टोकाच्या घटना' घडल्या. हरितगृह वायूंचे वातावरणात मिसळणे व त्याचे उत्सर्जन होणे या प्रक्रियेतील संतुलन बिघडल्यामुळे हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत जाऊन ते तापमानवाढीला कारणीभूत ठरत असल्याचे डॉ. पुरंदरे यांनी सांगितले. केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत केले.

### अफाट जलदृष्टीची साक्ष

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जलकामगिरीचा त्यांनी आढावा घेतला. दुष्काळ दौरा, दुष्काळ आयुक्ताची नेमणूक, राधानगरी धरणाचे बांधकाम, संस्थानाचे पाटबंधारे धोरण व स्वतंत्र पाटबंधारे खात्याची सुरुवात या बाबी महाराजांच्या अफाट जलदृष्टीची साक्ष देणाऱ्या असल्याने पुरंदरे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 OCT 2021
लोकमत

# महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान हा जागतिक वारसा

## लॉर्ड भिकू पारेख : चंद्रकांत लंगरे संपादित ग्रंथांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा गांधी बहुआयामी विचारव्यक्तिमत्त्वाचे धनी होते. त्यांचे विचार आणि तत्त्वज्ञान हा जागतिक वारसा आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गांधीवादी विचारवंत लॉर्ड भिकू पारेख यांनी शुक्रवारी केले. व्हर्जिनिया (अमेरिका) येथील जेम्स मॅडिसन विद्यापीठातील दिवंगत प्रा. टेरी बेट्झल आणि येथील शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्रा. चंद्रकांत लंगरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्याविषयी संपादित केलेल्या 'रिफ्लेक्शन्स ऑन महात्मा गांधी: द ग्लोबल परस्पेक्टीव्ह' आणि 'रिथिंकिंग महात्मा गांधी: द ग्लोबल अप्रायझल' या दोन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथांच्या ऑनलाइन प्रकाशनावेळी ते बोलत होते.

### संपूर्ण जगासाठी वारसा

महात्मा गांधींचा वारसा मला हक्काने लाभला आहे. हा केवळ माझ्या एकट्यासाठीचा वारसा नाही, तर संपूर्ण जगासाठी असल्याचे तुषार गांधी यांनी सांगितले.

या कार्यक्रमास महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, जेम्स मॅडिसन विद्यापीठाच्या प्रोव्होस्ट डॉ. हीथर कोल्टमन आणि कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅण्ड लेटर्सचे अधिष्ठाता डॉ. रॉबर्ट ऑग्युरे प्रमुख उपस्थित होते. महात्मा गांधी धार्मिक होते; पण मूलतत्त्ववादी नव्हते; राष्ट्रभक्त होते, पण जागतिक विचारसरणी जोपासणारे होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हे वैशिष्ट्य आजच्या ग्लोबल युगातही प्रकर्षाने लागू पडते. त्या विचारसरणीचा अंगिकार करून जगाने त्यानुसार वाटचाल करणे दूरगामी हितावह असल्याचे लॉर्ड पारेख यांनी सांगितले. महात्मा गांधी त्यांच्या विचारांनीच जगात शांतता, सामाजिक सौहार्द प्रस्थापित करणे शक्य असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. डॉ. लंगरे, गीता धरमपाल, विवेक सचदेवा, क्विनी प्रधान यांनी मनोगत व्यक्त केले. प्रोव्होस्ट डॉ. हीथर कोल्टमन यांनी स्वागत केले.

02 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षण पूर्ण करणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांचा सत्कार



टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व अन्य अधिकारी, शिक्षक.

टेंबलाईवाडी, ता. १ : शिवाजी विद्यापीठ परिवारातील विविध घटकांसह कोल्हापूरकरांकडून कधीच परकेपणाची वागणूक मिळाली नाही, अशी भावना विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतून पदवी, पदव्युत्तर, पीएचडी संशोधन पूर्ण केलेल्या परदेशी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाच्याअधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांत केंद्रीय परराष्ट्र विभागाच्या इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स (नवी दिल्ली) स्कॉलरशिप स्कीमअंतर्गत२०१८-१९ मध्ये पदवीसाठी व २०१९-२० मध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी परदेशी विद्यार्थी आले होते. २०१७-१८ मध्ये पीएचडीसाठीही काही विद्यार्थी प्रवेशित झाले. या विद्यार्थ्यांनी येथील शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचा निरोपानिमित्त विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षातर्फे सत्कार झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.



परदेशी विद्यार्थ्यांनी विद्यापीठात आपुलकी लाभल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय कक्षाचे डॉ. अनिल घुले, वसतिगृह अधीक्षक डॉ. जे. बी. यादव यांच्याविषयीही कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी त्यांच्या पुढील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. डॉ. जी. एस. राशीनकर यांनी विद्यार्थ्यांची माजी विद्यार्थी म्हणून नोंदणी करण्याची कार्यवाही केली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. के. डी. सोनावणे, डॉ. व्ही. वाय. धुपधाळे उपस्थित होते.

## इराणचे वर्घा मोखलेसी पहिले परदेशी पीएच.डी.धारक



२०१७-१८ मध्ये विद्यापीठात मानसशास्त्र विषयात पीएच.डी.साठी प्रवेश घेणारे इराणचे वर्घा बाहमन मोखलेसी हे विद्यापीठातून पीएच.डी. पदवी मिळविणारे पहिले परदेशी विद्यार्थी ठरले. त्यांच्यासह एकूण २० विद्यार्थ्यांनी यंदा विद्यापीठातून पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. विद्यार्थ्यांत इराक, मॉरिशस, अफगाणिस्तान, मोझांबिक व गिनिआ बिस्सू देशांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

02 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासाच्या गांधीवादाची मांडणी

## विद्यापीठाच्या गांधी अध्यासन केंद्रामध्ये अभ्यास सुरू

ओंकार धर्माधिकारी : सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १ : महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, त्यांनी घडवून आणलेल्या समाजसुधारणा याबाबत नेहमीच चर्चा होते; मात्र शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या गांधी विचारांची फारशी मांडणी होत नाही. हीच बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठातील गांधी अध्यासन केंद्राने शाश्वत विकासाचा गांधीवाद या विषयावर विविध उपक्रमांद्वारे अभ्यास केला आहे. यामध्ये शोधलेख, पुस्तक प्रकाशन आणि पीएचडीही केली आहे. याशिवाय विविध कार्यशाळा, सेमिनारही घेतले आहेत. यामुळे महात्मा गांधी यांच्या विचाराचा एक पैलू पुन्हा प्रकाशझोतात आला आहे.

गांधीजींनी विविध क्षेत्रांतील मूलभूत विचार मांडले आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट त्यांचे नव्हते. येथील समाजजीवन, अर्थकारण, कृषी, ग्रामविकास याबाबतचे त्यांचे चिंतन कालातीत आहे; मात्र गांधींच्या या विचारांची मांडणी फारशी होत नाही. यासाठी गांधी अध्यासन केंद्राने नियोजनपूर्वक काही उपक्रम राबवले.

अध्यासन केंद्रामध्ये प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी 'गांधी आणि पर्यावरणवाद' या विषयावर शोधलेख लिहिला होता. तो 'गांधी मार्ग' या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झाला. या लेखामध्ये महात्मा गांधी यांनी पर्यावरणाविषयी जे विचार मांडले त्याबाबत विस्तृत विवेचन केले आहे. डॉ. चौसाळकर यांनी 'महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास' या पुस्तकाचे संपादनही अध्यासनाच्या माध्यमातून केले आहे. नर्मदा बचाव आंदोलनातील धुरीण संजय संगवई यांनी 'समकालीन सत्याग्रही संघर्षाचे नवे रूप - नर्मदा खोऱ्यातील जनआंदोलन' हे पुस्तक लिहिले असून, अध्यासनाने ते प्रकाशित केले. या पुस्तकात गांधीजींचा सत्याग्रह, नर्मदा बचाओ आंदोलनातील सत्याग्रहाचे स्वरूप याबरोबरच शाश्वत विकासाच्या दृष्टीने मांडलेल्या गांधीजींच्या विचारांची संदर्भासह मांडणी केली आहे. डॉ. सुचिता सुगरहळ्ळी यांनी 'महात्मा गांधी आणि पर्यावरण चळवळी' या विषयावर पीएचडी केली असून, यामध्ये त्यांनी पर्यावरणातील गांधीवाद हा विषय मांडला आहे. अध्यासनाने 'महात्मा गांधी एन्व्हायरमेंटलिझम अँड कंटेम्प्ररी एन्व्हायरमेंटल मूव्हमेंट' या विषयावर २०१९ मध्ये राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. यामध्ये विविध अभ्यासकांनी गांधीजींच्या पर्यावरण आणि शाश्वत विकासाचे विचार मांडले. गांधी अध्यासन केंद्राने महात्मा गांधी यांच्या शाश्वत विकासाचा विचार सर्वसामान्य लोकांना कळावा, धोरणकर्त्यांनीही याचा विचार करावा, यासाठी विविध उपक्रमांतून शाश्वत विकासाचा गांधीवाद मांडला आहे.

> **देशातील खेडी स्वयंपूर्ण करून शाश्वत विकासाची संकल्पना महात्मा गांधी यांनी मांडली. यामध्ये माणसाबरोबरच पर्यावरण, नैसर्गिक संसाधनांचा मर्यादित वापर या सर्वच गोष्टींबाबतचा मूलभूत विचार मांडला आहे; मात्र स्वातंत्र्यानंतर शाश्वत विकासाच्या या संकल्पनेकडे दुर्लक्ष झाले. या संकल्पनेकडे लक्ष वेधण्यासाठी अध्यासनातर्फे विविध उपक्रम राबवले आहेत.**
>
> **- प्रा. डॉ. भारती पाटील,**
> समन्वयक, गांधी अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ.



02 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधी तत्त्वज्ञान हा जागतिक वारसा : पारेख

## डॉ. लंगरे संपादित आंतरराष्ट्रीय दोन संदर्भग्रंथांचे ऑनलाईन प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : "महात्मा गांधी बहुआयामी विचारव्यक्तित्वाचे धनी होते. त्यांचे विचार आणि तत्त्वज्ञान हा जागतिक वारसा आहे," असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गांधीवादी विचारवंत लॉर्ड भिकू पारेख यांनी येथे केले. व्हर्जिनिया (अमेरिका) येथील जेम्स मॅडिसन विद्यापीठातील दिवंगत प्रा. टेरी बेट्झल आणि शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्रा. चंद्रकांत लंगरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्याविषयी संपादित केलेल्या 'रिफ्लेक्शन्स ऑन महात्मा गांधी : द ग्लोबल परस्पेक्टिव्ह' आणि 'रिथिंकिंग महात्मा गांधी : द ग्लोबल अप्रायझल' या आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथांचे ऑनलाईन प्रकाशन झाले. महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जेम्स मॅडिसन विद्यापीठाच्या प्रोव्होस्ट डॉ. हिथर कोल्टमन, कॉलेज ऑफ आर्टस् अँड लेटर्सचे अधिष्ठाता डॉ. रॉबर्ट ऑग्युरे उपस्थित होते.



**लॉर्ड भिकू पारेख**

लॉर्ड पारेख म्हणाले, "महात्मा गांधी धार्मिक होते; पण मूलतत्त्ववादी नव्हते. राष्ट्रभक्त होते; पण जागतिक विचारसरणी जोपासणारे होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हे वैशिष्ट्य आजच्या युगातही प्रकर्षाने लागू पडते. त्या विचारसरणीचा अंगीकार करून जगाने त्यानुसार वाटचाल करणे दूरगामी हितावह आहे."

तुषार गांधी म्हणाले, "महात्मा गांधींचा वारसा सांभाळणे जबाबदारीचे काम आहे. हा केवळ माझ्यासाठी नसून संपूर्ण जगासाठी वारसा आहे. आजकाल हिंसात्मकता वाढीस लागली आहे. शारीरिक, पर्यावरणीय, औद्योगिक असे हिंसेचे विविधांगी विखारी स्वरूप जागतिक स्तरावर दृष्टीस पडते. हे महात्मा गांधींना अपेक्षित मूल्याधिष्ठित समाजव्यवस्थेच्या विपरीत आहे. ते बदलण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न करण्याची गरज आहे."

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "महात्मा गांधी यांचे विचार आजघडीला जगाला भेडसावणाऱ्या प्रत्येक समस्येवरील उत्तर आहेत."

संदर्भग्रंथांचे संपादक डॉ. लंगरे यांच्यासह लेखक डॉ. गीता धरमपाल, डॉ. विवेक सचदेवा, डॉ. क्विनी प्रधान यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. हिथर कोल्टमन यांनी स्वागत केले; तर डॉ. रॉबर्ट ऑग्युरे यांनी प्रास्ताविक केले. महात्मा गांधी सेंटरच्या संचालक डॉ. टैमी कासल यांनी आभार मानले.

02 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘अल्प कार्बन अर्थकारण’ हाच राजमार्ग

## डॉ. पुरंदरे : ‘हवामान बदल व शाश्वत विकास’वर व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : “हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी विकास प्रक्रियेत बदल करणे गरजेचे आहे. ‘अल्प कार्बन अर्थकारणा’कडे वाटचाल हाच हवामान बदलाला सामोरे जाण्याचा राजमार्ग आहे,” असे मत ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. प्रदीप पुरंदरे यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ‘सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलीटी स्टडिज्’तर्फे ‘हवामान बदल व शाश्वत विकास’ विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेत त्यांनी चौथे पुष्प गुंफले. ‘हवामान बदल



डॉ. पुरंदरे

आणि महापुराचे नियोजन’ असा विषय होता. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. पुरंदरे म्हणाले, “हवामान बदलानुसार जल व्यवस्थापन व पूर नियमनात बदल करावे लागतील. मॉन्सूनचा कालावधी बदलतो आहे. त्याप्रमाणे सिंचन हंगाम व धरण भरण्याच्या तारखा बदलाव्या लागतील. पुराचा धोका असलेल्या निवडक धरणांतील काही टक्के साठवण क्षमता पुरासाठी आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.” ते पुढे म्हणाले, “नैसर्गिकरीत्या होणाऱ्या



हवामान बदलाची तीव्रता व गती मानवी हस्तक्षेपामुळे अधिक वाढली आहे.

जून २०२१ मधील तापमान गेल्या १४२ वर्षांतील सर्वाधिक तापमान नोंदले. याच महिन्यात सर्वात जास्त आपत्तीजनक ‘टोकाच्या घटना’ घडल्या. हरितगृह वायूंचे वातावरणात मिसळणे व त्याचे उत्सर्जनाच्या प्रक्रियेतील संतुलन बिघडल्याने हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत जाऊन ते तापमानवाढीला कारणीभूत ठरत आहे. हे प्रमाण कमी झाले नाही, तर पृथ्वीच्या सरासरी पृष्ठीय तापमानात या शतकाच्या मध्यापर्यंत २ अंश सेल्सिअसने वाढ होईल, हे इंटरगव्हर्न्मेंटल पॅनेल ऑन क्लायमेंट चेंजचे अनुमान आहे.”

टेरी संस्थेने मांडलेल्या अहवालातील जिल्हानिहाय असुरक्षिता इंडेक्स व त्यातील काही ठळक मुद्द्यांसह राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जलकामगिरीचा आढावा घेतला. केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत केले.

तरूण भारत

# हवामान बदलाचे धोके जागरूकता आवश्यक

## डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

हवामान बदलांच्या अनुषंगाने प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध ॲप्लिकेशन्सतून हवामानातील बदलांच्या धोक्याबाबत जागरूकता करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पर्ड्यू विद्यापीठातील डॉ. व्यंकटेश मेरवाडेंनी केले.



शिवाजी विद्यापीठातील 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनेबिलिटी स्टडिज्"मार्फत 'हवामान बदल व शाश्वत विकास" यावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'अमेरिकेतील महापुराचे नियोजन आणि त्या तंत्रज्ञानाचा भारतात वापर" यावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत होते.

डॉ. मेरवाडे म्हणाले, महापुराची शक्यता वर्तवणारे मॉडेल कोणते आहे, यापेक्षा त्यासाठी वापरलेले मापदंड महत्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे अचूक माहितीचा साठा आणि पुरवठा गरजेचा आहे. पूर नकाशे स्थिर असून कोणत्या भागात पूर येईल, याची कल्पना ते देऊ शकत नाहीत. हा दोष दूर करत अमेरिकेत अनेक भागांचा वैज्ञानिक पद्धतीने चिकित्सक अभ्यास केला आहे. एकमितीय व द्विमितीय हायड्रोडायनॅमिक मॉडेलचा तुलनात्मक आढावाही त्यांनी घेतला. अमेरिकेतील युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्वे फेडरल इमर्जन्सी मॅनेजमेंट एजन्सी, नॅशनल वेदर सर्व्हिसमार्फत चालणारे रेन गेज स्टेशनची माहिती दिली.